महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-क
सेवा प्रवेश नियम

पदोन्नतीने पदे भरण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक:- सेवाप्र-१७९६/प्र.क्र.७२/९६/कोषा-३-अ
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:- ६ डिसेंबर १९९६.

शासन निर्णय

शासन अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक :- सेवाप्र-१७९४/सीआर - १३०/९४/कोषा-३-अ, दि. १७ जानेवारी, १९९६ अन्वये महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-क मधील कर्मचा-यांकरिता सेवा प्रवेश नियम विहित करण्यात आले आहेत. सदरहू नियमातील नियम ७ नुसार सेवा भरतीचे गुणोत्तर प्रमाण २० : ८० म्हणजेच पदोन्नतीसाठी २० टक्के पदे व सरळ सेवाप्रवेशाने ८० टक्के पदे अशी विहित करण्यात आले. पदोन्नतीने भरावयाची २० टक्के पदे ही लेखा व कोषागारे संचालनालयाच्या अधिमत्याखालील [१] कोषागारे कार्यालयातील "उपलेखापाल" [२] अभिदान व लेखा कार्यालयातील "निवड श्रेणी लिपिक" [३] मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, यांच्या कार्यालयातील "निवडश्रेणी लिपिक/ सहाय्यक अधिक्षक, जिल्हा ग्रामपंचायत लेखा परीक्षक-श्रेणी-२" इ. व संचालनालय व विभागीय कार्यालयांतील "सहाय्यक अधिक्षक" या संवर्गातील कर्मचा-यांना पदोन्नती देऊन भरावयाची आहेत. सामान्यपणे पदोन्नती देण्यासाठी संबंधित चारही कार्यालयातील कर्मचा-यांची सामायिक ज्येष्ठतासूची असणे अपेक्षित आहे. परंतु सदर चारही विभागातील उपरोक्त संवर्गातील कर्मचा-यांचे सेवाप्रवेश नियम भिन्न असल्यामुळे तसेच या कर्मचा-यांच्या एका विभागातून दुस-या विभागात बदल्या होत नसल्यामुळे या वेगवेगळ्या संवर्गातील कर्मचा-यांची सामायिक ज्येष्ठतासूची तयार करणे शक्य नाही. संचालनालयाच्या अधिमत्याखालील सर्व कार्यालयांतील कर्मचा-यांना महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-क मध्ये पदोन्नती मिळावी या हेतूने शासनाने पदोन्नतीने नियुक्ती करण्याचे ठरविले आहे, व त्यासाठी वर नमूद केल्याप्रमाणे २० टक्के पदे पदोन्नतीसाठी राखून ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. संचालनालयाच्या अधिमत्याखालील सर्व कार्यालयातील संबंधित कर्मचा-यांना या पदोन्नतीच्या संधीचा लाभ यथाप्रमाणे

[क्र.मा.प.]

अनुज्ञेय करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. शासन आता असे आदेश देत आहे की, शासन अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक:- सेवाप्र-१७९४/प्र.क्र. १३०/९४/कोषा-३-अ, दिनांक १७.१.१९९६ अन्वये महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-क संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमात पदोन्नतीने नियुक्ती देण्यासाठी करण्यात आलेल्या तरतूदीनुसार, उपलब्ध असलेली २० टक्के पदे, संचालक, लेखा व कोषागारे यांच्या अधिपत्याखालील [१] जिल्हा कोषागारे व उपकोषागारे [२] अधिदान व लेखा कार्यालय [३] मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा व [४] संचालनालय लेखा व कोषागारे व विभागीय उपसंचालक, लेखा व कोषागारे, या प्रत्येक कार्यालयातील पदोन्नतीपात्र संवर्गातून खाली विहित केलेल्या सूत्रानुसार पदे भरण्यात यावीत.

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-क संवर्गातील पदोन्नतीच्या २०% कोटयातील पदे [संवर्गसंख्येच्या २०% पदे]		संचालक लेखा व कोषागारे यांच्या अधिपत्याखालील प्रत्येक कार्यालयातील आस्थापनेवर असलेली महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-क संवर्गातील पदे.	पदोन्नतीने भरण्यासाठी संचालक लेखा व कोषागारे यांच्या अधिपत्याखालील प्रत्येक कार्यालयासाठी उपलब्ध होणारी संवर्गातील एकूण पदे.
संचालक लेखा व कोषागारे यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयातील आस्थापनेवर असलेली वित्त व लेखा सेवा गट-क संवर्गातील एकूण पदे.	x		=

३. याबाबत सेवाप्रवेश नियमात आवश्यक तरतूद करण्याची कार्यवाही यथावकाश करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ह.द.पाटील]
कार्यासन अधिकारी, वित्त विभाग.

प्रति,

सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई. [पत्राने]
सामान्य प्रशासन विभाग [कार्यासन-१२] मंत्रालय, मुंबई.
संचालक लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.